**श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक** >> पान 2

**नदीजोड प्रकल्पांतील कामांचा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतला आढावा** >> पान 3

**'नायक' स्टाईलमध्ये मैदानात उतरले नगराध्यक्ष किशोर गारोळे** >> पान 4


### सुविचार

**छोट्या लोकांच्या सावरल्या मोठ्या पडायला लागल्या की सूर्य अस्तास चालला असे समजावे. - अज्ञात**



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

**मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034**

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 176 ■ गुरूवार, दि. 05 फेब्रुवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**शाहिद कपूरच्या 'ओ रोमियो' चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घाला; हुसेन उस्ताराच्या मुलीची न्यायालयात धाव**

आतील पान

## एक्सप्रेवेवर प्रचंड मोठी वाहतूक कोंडी अन् २५ किलोमीटर पर्यंत रांगा

**लोणावळा/प्रतिनिधी :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी सायंकाळी घडलेल्या एका अपघातामुळे संपूर्ण मार्गावर वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. आडोशी बोगद्याच्या परिसरात ज्वलनशील वायूची वाहतूक करणारा टँकर उलटल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव महामार्गावरील वाहतूक दीर्घकाळासाठी थांबवावी लागली. या घटनेचा परिणाम म्हणून महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, अनेक प्रवासी अनेक तास अडकून पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणारा हा टँकर एका तीव्र वळणावर चालकाच्या नियंत्रणाबाहेर गेला आणि बोगद्याच्या प्रवेशाजवळ पलटी झाला. टँकरमध्ये असलेल्या वायूची गळती सुरू झाली. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे रोखली, तर पुण्याकडील वाहतूकही मर्यादित स्वरूपात चालू ठेवण्यात आली.अपघातानंतर सुमारे आठ तास महामार्गावर वाहतूक पूर्णतः ठप्प होती. मध्यरात्रीनंतर धोका काही प्रमाणात कमी झाल्यानंतर टँकर बाजूला घेण्यात आला आणि एका लेनवरून वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र, वाहतुकीचा वेग अत्यंत संथ असल्याने वाहनांच्या रांगा अजूनही कमी झालेल्या नाहीत.

या घटनेमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासह जुना पुणे-मुंबई महामार्गावरही मोठ्या प्रमाणात कोंडी झाली आहे. काही ठिकाणी वाहनांच्या रांगा २० ते २५ किलोमीटरपर्यंत पोहोचल्याची माहिती आहे. अनेक प्रवासी पहाटेपासून एकाच ठिकाणी अडकून असल्याने संताप व्यक्त करत आहेत. काही प्रवाशांच्या विमान प्रवासाच्या वेळा चुकल्या असून, उपचारासाठी निघालेले रुग्ण आणि मालवाहतूक करणारी वाहनेही या कोंडीत अडकली आहेत.

## ३१ मार्च बँक सुरु राहणार

**मुंबई, दि. ०४ फेब्रुवारी :** आर्थिक वर्ष २०२५-२६ चा शेवटचा दिवस असलेल्या ३१ मार्च २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी सरकारी व्यवहारांवर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्या दिवशी सरकारशी संबंधित बँकिंग सेवा सुरू ठेवण्याचे निर्देश ठइख कडून देण्यात आले आहेत.

रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार, केंद्र आणि राज्य सरकारांच्या वतीने व्यवहार करणाऱ्या बँकांच्या (राष्ट्रीयकृत बँका अर्थात नॅशनलाइज्ड बँका) शाखा ३१ मार्च रोजी सामान्य नागरिकांसाठी खुल्या राहणार आहेत. या निर्णयामुळे वित्तीय वर्ष संपताना होणारे सरकारी आर्थिक व्यवहार वेळेत पूर्ण करता येणार आहेत.

RBI ने स्पष्ट केले आहे की, भारत सरकारच्या विनंतीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. कारण वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिवशी कर संकलन, शासकीय देयके, अनुदान वितरण, विभागीय हस्तांतरणे तसेच इतर आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर होतात. अशा वेळी बँक सेवा बंद राहिल्यास लेखाजोखा आणि सेटलमेंट प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात. या निर्णयानुसार, कर भरणे, चालान जमा करणे, सरकारी खात्यांशी संबंधित पेमेंट्स तसेच इतर शासकीय बँकिंग सेवा ३१ मार्च रोजी उपलब्ध राहतील. त्यामुळे करदाते, व्यापारी, उद्योग आणि सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांना विकून टाकले : नाना पटोले

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेसोबतच्या नुकत्याच केलेल्या करारामुळे देशातील शेतकरी उध्वस्त होईल अशी शक्यता निर्माण झाली आहे. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी या देशातील शेतकऱ्यांना विकून टाकलं आहे. म्हणून या कराराचा आम्ही विरोध आणि निषेध करतो,असे वक्तव्य काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केले आहे.

आमचे नेते आणि विरोधी पक्ष नेते राहुल गांधींनी पाच जुलै २०२५ ला केंद्रीय मंत्री पियुष गोयल त्यांना पण सांगितलं होतं की तुम्ही आता जे काही करत आहात, याचा परिणाम अमेरिकेसमोर झुकावं लागणार. मोदी हे सरेंडर झाले आहेत,पण समोर जी भविष्यवाणी केली होती तीच आता समोर आली आहे. मोदी यांचे मित्र अदानी ज्याप्रकारे अमेरिकेच्या तावडीत सापडले आणि त्यांना वाचवण्यासाठी, एकीकडे ट्रम्पने प्रयत्न केले. भारतात महागाई वाढवण्याचे काम केलं अशी टीका नाना पटोले यांनी केली.




# औषधानंच घेतला जीव! कफ सिरपनं चार वर्षाच्या मुलाचा मृत्यू; मृतांची संख्या २५ वर पोहोचली!

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** गेल्या वर्षी मध्यप्रदेश राज्यात दूषित कोल्ड्रिफ कफ सिरपचे सेवन केल्यानं २४ लहान मुलांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. गेल्या चार महिन्यांपासून नागपूरच्या एम्स रुग्णालयत उपचार घेत असलेल्या आणखी एका बाळाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळं या प्रकरणात मृत्यूची संख्या २५ झाली आहे.

मध्यप्रदेश, राजस्थान राज्यातील लहान मुलांचा मृत्यू झाल्यानं संपूर्ण देशभरात खळबळ उडाली होती. गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यात ही घटना घडली होती. मध्यप्रदेशच्या छिंदवाडा जिल्ह्यात दूषित कोल्ड्रिफ कफ सिरपचे सेवन केल्यामुळं अनेक लहान मुलांचे मृत्यू झाले होते. घटनेचे गांभीर्य वाढल्यानं त्यावेळी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव हे स्वतः नागपुरच्या



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मेडिकला जाऊन मुलांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. त्यानंतर चार महिन्यांनी कफ सिरप सेवन प्रकरणात आणखी एक मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळं या प्रकरणात मृत्यूची संख्या २५ झाली आहे.

४ वर्षीय हर्ष यदुवंशी नामक बाळाला गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यात नागपूरच्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. हर्ष यदुवंशी मध्य-प्रदेशच्या छिंदवाडा जिल्ह्यातील रहिवासी होता. दूषित कफ सिफर प्राशन केल्यानं सप्टेंबर महिन्यात हर्षची तब्येत खालावली. त्यामुळं हर्षला नागपूरच्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. १२८ दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्याचा मृत्यू झाला आहे.

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या दिशानिर्देशानुसार, लहान मुलांमध्ये खोकल्याचे आजार स्वतःहून बरे होतात, अनेकदा औषधाशिवाय बरे होतात. यासाठी पुरेसा आराम आणि जास्त पाणी पिल्यामुळं व इतर गैरऔषधी उपाययोजना हे प्रथमोपचार पुरेसे असते. त्यामुळं २ वर्षाखालील मुलांना सर्दी आणि खोकल्याकरिता औषध देणं टाळावं. ५ वर्षावरील मुलांना आवश्यकता असल्यास काळजीपूर्वक वैद्यकीय सल्ल्यानुसार आणि देखरेखीतच योग्य डोसमध्ये औषध द्यावे.

> एम्स नागपूरच्या बाल अतिदक्षता विभागाच्या पथकानं अथक प्रयत्न केले. परंतु खोकल्याच्या औषधाच्या विषबाधेमुळं मुलाच्या मेंदूवर गंभीर परिणाम झाला होता. मुलाच्या मेंदूमध्ये काही प्रमाणात सुधारणा होईल, या आशेने आम्ही ११७ दिवस मूत्रपिंड निकामी होणे, न्यूमोनिया, सेप्टिसेमिया इत्यादी गुंतागुंतीवर उपचार करत राहिलो. आमचे कार्यकारी संचालक, डॉ. प्रशांत जोशी यांच्या वैयक्तिक मार्गदर्शनाखाली,हे सुनिश्चित केलं की कुटुंब त्यांच्या दुःखात किंवा गरजांमध्ये कधीही एकटे राहणार नाही, आम्ही मुलाला वाचवण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. दुर्दैवानं, आम्ही ही लढाई हरलो आणि ४ महिने व्हेंटिलेटरवर ठेवल्यानंतर मुलाचा मृत्यू झाला.
>
> **- डॉ मीनाक्षी गिरीश (बालरोग विभाग), एम्स रुग्णालय नागपूर**

## इग्नाईट - २०२६ मधून मुंबईच्या निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राची कार्यक्षमता व उत्पादन वाढवण्याच्या उद्देशाने (२०२६) या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा विकास आयुक्त (उद्योग) दिपेंद्रसिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुंबई शहर अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे झाली. कार्यशाळेला उद्योग सह संचालक श्रीमती विजू सिरसाठ, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबईचे अध्यक्ष विजय कलंत्री, एसईपीसीचे प्रतिनिधी विवेक बक्षी, एफआयईओ च्या श्रीमती रिषु मिश्रा, चे विक्रम जैन, सीप्झ संस्थेच्या श्रीमती शामली बॅनर्जी यांच्यासह विविध क्षेत्रांतील १८० प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी उद्योग सह संचालक विजू सिरसाठ यांनी मुंबईतील उद्योजकीय वातावरण वृद्धिंगत करण्यासाठी इग्नाईट कार्यशाळेची भूमिका स्पष्ट केली. निर्यात धोरण, डिस्ट्रिक्ट अॅज एक्स्पोर्ट हब, नवीन औद्योगिक धोरण तसेच उद्योग विभागाच्या विविध पुढाकारांची माहिती उपस्थित उद्योजकांना देण्यात आली. एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) उपक्रमांतर्गत मुंबई उपनगरासाठी जेम्स अॅण्ड ज्वेलरी तर मुंबई शहरासाठी लेदर उत्पादनांची निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई शहर जिल्हा निर्यातीत आघाडीवर असून, 'सेव्हन पॉइंट्स अजेंडा' राबवून पुढील वर्षी निर्यातीमध्ये डबल डिजिट वाढ साध्य करण्याचे उद्दिष्ट असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. याअंतर्गत प्रस्तावित लेदर पार्क व जेम्स अॅण्ड ज्वेलरी क्लस्टरबाबत माहिती देण्यात आली. तसेच उद्योग सह संचालक कार्यालय, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज आणि वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई यांच्यात ओडीओपी ब्रँडिंग व प्रमोशनसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

## पाकिस्तानला मोठा दणका, ४० टक्के भूभाग हातातून निसटला?

### पाकच्या संरक्षण मंत्र्यांची थेट संसदेमध्ये कबुली

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था :** ऑपरेशन सिंदूरनंतर आम्ही भारतासोबत लढण्यास तयार आहोत, आम्ही प्रत्युत्तर देऊ असे मोठ मोठे दावे करणाऱ्या पाकिस्तानची खरी स्थिती अखेर आता जगासमोर आली आहे. बलोच बंडखोरांनी पाकिस्तानच्या सरकारला जेरीस आणलं आहे. बलोच बंडखोरांसमोर पाकिस्तानी सैनिक हतबल झाले आहेत. बलोच बंडखोरांकडून बलुचिस्तानमध्ये सुरू असलेल्या पाकिस्तानी सैनिकांसोबतच्या संघर्षाचे व्हिडीओ देखील सोशल मीडियावर पोस्ट केले जात आहेत, ज्यामध्ये बलुचिस्तानमधून पाकिस्तानी सैन्य माघार घेताना दिसत आहे. परिस्थिती एवढी बिकट बनली आहे, की आता खुद्द पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी देखील पाकिस्तानचा ४० टक्के भाग आमच्या हातून निसटल्याचं संसदेमध्ये कबूल केलं आहे.

बलोच बंडखोरांनी पाकिस्तानच्या नाकात दम केला आहे, पाकिस्तानचं सरकार हातबल झालं आहे. पाकिस्तानचे



संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी संसदेमध्ये माहिती देताना म्हटलं आहे की, बलुचिस्तानमधल्या विशाल भौगोलिक परिस्थितीमुळे तिथे तैनात करण्यात आलेल्या सौनिकांना या बंडाचा बिमोड करण्यात यश मिळत नाहीये, परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. बंडखोरांचा आमच्यावर प्रचंड दबाव आहे, बलुच लिबरेशन आर्मी आता केवळ फक्त एक बंडखोरांची टोळी राहिली नसून, त्यांचं एक जबरदस्त नेटवर्क तयार झालं आहे. त्यांच्याकडे वीस लाख रुपयांच्या रायफल्स आहेत, आमच्याकडे नाहीयेत, त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्र आहेत, ते पण आमच्याकडे नाहीयेत, असं पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यानं म्हटलं आहे.

पुढे बोलताना त्यांनी असं देखील म्हटलं आहे की, बलुचिस्तानचं क्षेत्रफळ हे फार मोठं आहे. पाकिस्तानच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४० टक्के क्षेत्रफळ हे एकट्या बलुचिस्तामध्ये आहे. मोठं क्षेत्रफळ आणि भौगोलिक प्रतिकूल परिस्थितीमुळे या आघाडीवर आम्हाला अपयश येत असल्याचं पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यानं म्हटलं आहे. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्याचं हे वक्तव्य पाकिस्तानची हतबलता दाखवत आहे.

भौगोलिक परिस्थितीच कारण देऊन पाकिस्तानकडून आपला पराभव लपवला जात असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बलोच बंडखोरांकडून स्वतंत्र बुलचिस्तानची मागणी करण्यात येत आहे, या पार्श्र्वभूमीवर या लढ्यात त्यांना मोठं यश मिळाल्याचं दिसून येत आहे.

## शक्तीपीठ महामार्गाच्या आराखड्यात बदल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील साडेतीन शक्तीपीठांना जोडणाऱ्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला कोल्हापूर जिल्ह्यातून तीव्र विरोध झाल्यानंतर राज्य सरकारने अखेर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या आराखड्यात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकरी, स्थानिक नागरिक आणि विविध संघटनांच्या आंदोलनाची दखल घेत महामार्गाचा मार्ग बदलण्यात आला असून, कागल आणि हातकणंगले तालुक्यांचा मोठा भाग वगळण्यात आला आहे. या बदलामुळे महामार्ग सातारा जिल्ह्यातून जाणार असला तरी प्रकल्पाच्या एकूण खर्चात सुमारे १५ हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

शक्तीपीठ महामार्गाचा मूळ आराखडा जाहीर झाल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, हातकणंगले, भुदरगड, आजरा आणि चंदगड तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर विरोध झाला होता. शेतजमीन मोठ्या प्रमाणावर संपादित होणार असल्याने शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. २०२४ च्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विरोध अधिक तीव्र झाला होता.

या पार्श्वभूमीवर सरकारने महामार्गाच्या आखणीत बदल करण्याचे आश्वासन दिले होते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) तयार केलेल्या सुधारित आराखड्यानुसार कागल आणि हातकणंगले तालुक्यांचा मोठा भाग महामार्गाच्या मार्गातून वगळण्यात आला आहे. याशिवाय सिंधुदुर्ग, कोल्हापूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांतील



मार्गातही बदल करण्यात आले आहेत. नव्या आराखड्यानुसार हा महामार्ग यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग अशा १३ जिल्ह्यांतून जाणार आहे.

सातारा जिल्ह्यातील माण आणि खटाव तालुक्यांचा या महामार्गात नव्याने समावेश करण्यात आला आहे. ३९५ गावांमधून जाणार महामार्ग

मार्ग बदलल्यामुळे महामार्गाची लांबीही वाढली आहे. आधी ८०२ किलोमीटर असलेला महामार्ग आता सुमारे ८५६ किलोमीटर लांबीचा होणार आहे. तसेच, आधी ३५० गावांमधून जाणारा हा प्रकल्प आता सुमारे ३९५ गावांमधून जाणार आहे. परिणामी भूसंपादनाचा व्याप वाढून सुमारे ८ हजार ५०० हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. या भूसंपादनाचा संपूर्ण खर्च राज्य सरकार उचलणार असून त्यासाठी कर्ज उभारण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाचा एकूण खर्च आधीच्या ८६ हजार कोटी रुपयांवरून वाढून सुमारे १ लाख १ हजार कोटी रुपयांपर्यंत जाणार आहे. वैशिष्ट्ये काय?

शक्तीपीठ महामार्ग हा मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार महामार्ग असणार आहे. या महामार्गामुळे वाहनचालकांना वेगवान व सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळेल, तसेच राज्याच्या पूर्व आणि पश्चिम भागांमधील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा सरकारचा दावा आहे.

एमएसआरडीसीने तयार केलेला सुधारित प्रस्ताव राज्य सरकारच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्याची तपासणी सुरू आहे. अंतिम मंजुरीनंतर भूसंपादन आणि प्रत्यक्ष कामाला गती दिली जाणार आहे.

## एकलव्य स्कूलमध्ये प्रवेशासाठी १ मार्चला पूर्वपरीक्षा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे अंतर्गत सहा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही प्रक्रिया राबवली जात आहे. त्यानुसार अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे विभागांतर्गत असलेल्या सहा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमधील ५८३ रिक्त जागांसाठी १ मार्च, २०२६ रोजी प्रवेश पूर्वपरीक्षा होणार असल्याचे आदिवासी विकास कार्यालय, ठाणे येथील अपर आयुक्त गोपीचंद कदम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

सहा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी इयत्ता सहावीच्या ३६० जागा (१८० मुले व १८० मुली) विद्यार्थ्यांना प्रवेश पूर्वपरीक्षेच्या माध्यमातून दिला जाणार आहे. तर इयत्ता सातवी ते नववीच्या २२३ रिक्त जागांवर विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार व पूर्वपरीक्षेद्वारेप्रवेश मिळणार आहे.

सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रत्येक एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये इयत्ता सहावीसाठी ३० मुले व ३० मुली अशी एकूण ६० प्रवेश क्षमता असणार आहे. तर इयत्ता सातवी, आठवी व नववीसाठी रिक्त जागांचा अनुशेष भरण्यात येणार आहे. या सर्व जागांवर पूर्वपरीक्षेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. शाळानिहाय रिक्त जागांचा तपशील :- कांबळगाव ७०, शेंडेगाव ७७, सवणे ८०, पळसुंडे (जव्हार) : १२७, हिरवे (मोखाडा) १४७, चळणी (डहाणू) ८२ अशा एकूण ५८३ जागा रिक्त आहेत, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

## नव्या उद्योगसंस्कृतीला चालना

आजकाल सर्वत्र डिजिटल यंत्रणेचा बोलबाला दिसून येतो. त्यामुळे डिजिटल वस्तूंच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या निर्मितीमध्ये असलेली आत्मनिर्भरता महत्त्वाची ठरते. हेच ओळखून भारताच्या यंदाच्या अर्थसंकल्पात सेमीकंडक्टरनिर्मिती आणि दुर्मीळ खनिज उत्खननाला प्राधान्य दिले आहे. त्यातून भारताला होणाऱ्या लाभाचा घेतलेला आढावा... २१व्या शतकातील जागतिक अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ज्ञान, तंत्रज्ञान, नवकल्पना आणि डिजिटल क्षमतेवर उभी आहे. या पार्श्वभूमीवरच भारताने आपली आर्थिक, औद्योगिक आणि तंत्रज्ञानविषयक दिशा नव्याने निश्चित करण्याच्या उद्देशाने, केंद्रीय अर्थसंकल्पाचा प्रभावी वापर केला आहे. यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये 'सेमीकंडक्टर २.० मिशन', दुर्मीळ पृथ्वी खनिजांचे उत्खनन, इलेक्ट्रॉनिक उत्पादन आणि चिप डिझाईन यांना दिलेले महत्त्व हे केवळ आर्थिक घोषणांचे संकलन नसून, भारताला आत्मनिर्भर करण्याबरोबरच जागतिक महासत्तेच्या दिशेने नेणाऱ्या दीर्घकालीन रणनीतीचेही द्योतक आहे. 'आत्मनिर्भर भारत' ही केवळ राजकीय घोषणा नसून ती आर्थिक स्वातंत्र्य, तंत्रज्ञानातील आत्मविश्वास आणि जागतिक स्पर्धेत नेतृत्व करण्याच्या क्षमतेचा संगम आहे. सेमीकंडक्टर हे आधुनिक युगाचे नवे तेल आहे असे म्हणणे, वावगे ठरणार नाही. स्मार्टफोनपासून ते उपग्रहांपर्यंत, कृत्रिम बुद्धिमत्तेपासून ते संरक्षण प्रणालींपर्यंत प्रत्येक प्रगत तंत्रज्ञानाचा आत्मा म्हणजे सेमीकंडक्टर चिप. आज जगातील सेमीकंडक्टर क्षेत्रातील उत्पादन प्रामुख्याने काही मोजक्याच देशांमध्ये केंद्रित झालेले दिसते. त्यामुळे पुरवठा साखळीतील अडथळे, भू-राजकीय तणाव आणि व्यापार निर्बंधांच्या परिणामांची छाया जागतिक अर्थव्यवस्थेवर दिसून येते. 'कोविड-१९' नंतरच्या काळात निर्माण झालेल्या चिप-टंचाईने जगाला या क्षेत्राचे महत्त्व प्रकर्षाने जाणवून दिले. भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी चिप्सबाबत परदेशी आयातीवर अवलंबून राहणे म्हणजे, भविष्यातील धोका असल्याचे ओळखून केंद्रीय अर्थसंकल्पात 'सेमीकंडक्टर २.० मिशन'ची संकल्पना मांडण्यात आली आहे. 'सेमीकंडक्टर २.० मिशन' हे पहिल्या टप्प्यातील धोरणाचा विस्तार आणि अधिक सखोल रूप आहे. पहिल्या टप्प्यात उत्पादन प्रकल्पांना प्रोत्साहन, विदेशी गुंतवणुकीसाठी सवलती आणि मूलभूत पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला होता. दुसऱ्या टप्प्यात मात्र संपूर्ण मूल्य-साखळीवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. यामध्ये संशोधन व विकास, डिझाईन क्षमता, वेफर उत्पादन, पॅकेजिंग, चाचणी आणि कुशल मनुष्यबळनिर्मिती यांचाही समावेश होतो. केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदी पाहता, भारत केवळ असेंब्ली देश न राहता पूर्ण सेमीकंडक्टर इकोसिस्टम उभारण्याचा प्रयत्न करत आहे. हे मिशन यशस्वी झाले, तर भारताला निर्यातीद्वारेही मोठ्या प्रमाणात परकीय चलन उपलब्ध होईल. सेमीकंडक्टर उद्योगाचा थेट संबंध दुर्मीळ पृथ्वी खनिजांशी आहे. लिथियम, कोबाल्ट, निओडिमियम, प्रसेओडिमियम यांसारखी खनिजे आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणे, बॅटरी तंत्रज्ञान, चिप उत्पादन आणि हरितऊर्जा क्षेत्रासाठी अत्यंत आवश्यक आहेत. सध्या या दुर्मीळ पृथ्वी खनिजांच्या उत्खननावर आणि प्रक्रिया क्षमतेवर काही मोजक्याच देशांचे वर्चस्व आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत त्यांच्या किमती, पुरवठा आणि राजकीय दबाव यांचा खेळ सुरू असतो. भारताकडे दुर्मीळ पृथ्वी खनिजांचे मोठे साठे असूनही, त्यांचा पुरेसा आणि शास्त्रीय पद्धतीने वापर अद्याप झाला नव्हता. केंद्रीय अर्थसंकल्पात या खनिजांच्या शोध, उत्खनन आणि प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत. मात्र हे करताना पर्यावरणीय समतोल राखण्याचे मोठे आव्हान आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात शाश्वत उत्खनन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पर्यावरणपूरक प्रक्रिया यांवर भर देण्यात आला आहे. या विकासामुळे एकीकडे उद्योगांना आवश्यक असा कच्चा माल देशातच उपलब्ध होईल आणि दुसरीकडे ग्रामीण व दुर्गम भागात रोजगारनिर्मितीही होईल. खाण उद्योगाच्या आधुनिकीकरणामुळे, स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळेल आणि प्रादेशिक समतोलही साधला जाईल. इलेक्ट्रॉनिक उत्पादन हे सेमीकंडक्टर आणि दुर्मीळ पृथ्वी खनिजांचे प्रत्यक्ष फलित आहे. भारत गेल्या काही वर्षांत 'मेक इन इंडिया' आणि 'पीएलआय' योजनांमुळे इलेक्ट्रॉनिक उत्पादनात मोठी झेप घेत आहे. स्मार्टफोन, टॅब्लेट, लॅपटॉप, दूरसंचार उपकरणे, ऑटोमोबाईल इलेक्ट्रॉनिक आणि वैद्यकीय उपकरणे या क्षेत्रांत भारताचा वाटा सातत्याने वाढता आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात इलेक्ट्रॉनिक उत्पादनासाठी दिलेल्या सवलती, निर्यात प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधा विकासामुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उदयास येत आहे. इलेक्ट्रॉनिक उत्पादनाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती. उत्पादन प्रकल्पांमध्ये थेट रोजगारासोबतच पुरवठा साखळी, वाहतूक, लॉजिस्टिस आणि सेवा क्षेत्रातही अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतो. भारतासारख्या तरुण लोकसंख्येच्या देशासाठी ही संधी अत्यंत महत्त्वाची अशीच. यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमांनाही चालना मिळते. तसेच शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी होऊन 'स्किल इंडिया'चा उद्देशही साध्य होतो. चिप डिझाईन हे सेमीकंडक्टर क्षेत्रातील मेंदू मानले जातात. यांच्या उत्पादनासाठी मोठ्या भांडवलाची गरज असली, तरी डिझाईन क्षेत्रात बौद्धिकसंपदा आणि सर्जनशीलतेला अधिक महत्त्व असते. भारताकडे जागतिक दर्जाचे अभियंते, सॉफ्टवेअर तज्ज्ञ आणि डिझाईन क्षमता विपुल प्रमाणात आहेत. अनेक जागतिक सेमीकंडक्टर कंपन्यांचे डिझाईन सेंटर भारतात असूनही, या क्षमतेचा भारतीय कंपन्यांच्या माध्यमातून पुरेसा उपयोग आजवर झाला नव्हता. केंद्रीय अर्थसंकल्पात चिप डिझाईन स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. चिप डिझाईनमध्ये आत्मनिर्भर झाल्याने केवळ आर्थिक फायदाच नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेचे हित देखील संभाळले जाणार आहे. संरक्षण, अवकाश, दूरसंचार आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधा क्षेत्रांत वापरल्या जाणाऱ्या चिप्स स्वदेशी असणे, ही काळाची गरज आहे. परकीय चिप्सवरचे अवलंबित्व सायबर सुरक्षा, डेटा सुरक्षितता आणि रणनीतिक स्वायत्तता धोक्यात आणू शकते. म्हणूनच, चिप डिझाईन आणि उत्पादनात स्वावलंबन हा आत्मनिर्भर भारताचा केंद्रबिंदू आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातील या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे भारताची महासत्तेकडे वाटचाल. महासत्ता म्हणजे केवळ लष्करी ताकद नव्हे; तर आर्थिक सामर्थ्य, तंत्रज्ञानातील नेतृत्व, जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका आणि नवकल्पनांचा स्रोत असणे. सेमीकंडक्टर, दुर्मीळ पृथ्वी खनिजे, इलेक्ट्रॉनिक उत्पादन आणि चिप डिझाईन या चार स्तंभांवर उभा राहणारा भारत, जागतिक अर्थव्यवस्थेत निर्णायक भूमिका बजावू शकतो. यामुळे भारत उत्पादक, नवोन्मेषक आणि निर्यातदार देश होईल. आत्मनिर्भर भारताची संकल्पना आत्मविश्वासपूर्ण आहे. जागतिक व्यापारातून अलग होणे हा उद्देश नसून, जागतिक बाजारात समान ताकदीने उभे राहणे हा त्यामागील हेतू आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातील धोरणे पाहता, भारत विदेशी गुंतवणुकीचे स्वागत करतानाच, स्वदेशी उद्योगांच्या सक्षमीकरणावरही भर देत आहे. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी, स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि संशोधन निधीमुळे नव्या उद्योगसंस्कृतीला चालना मिळत आहे.

# श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक








## ➤ समाधी मंदिर भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थळ –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
## ➤ सांस्कृतिक पुनरोत्थानाच्या कार्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मोठी गती

**दैनिक आपला विदर्भ**

**हरिद्वार/वृत्तसंस्था:** श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक म्हणून कार्य केले. म्हणूनच आज नव्या पिढीसमोर भारतीय संस्कृतीची महानता टिकून आहे. त्यांच्या समाधी मंदिरामुळे भावी पिढ्यांसाठी एका प्रेरणास्थळ निर्माण झाल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

उत्तराखंड हरिद्वार येथील श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या समाधी मंदिरात श्रीविग्रह मूर्ती स्थापना समारंभात मुख्यमंत्री फडणवीस प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. या सोहळ्यास माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, प.पू. जुनापीठाधिश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरीजी, राम जन्मभूमी मंदिर न्यासाचे स्वामी गोविंददेव गिरीजी, पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया, उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ल, स्वामी अखिलेश्वरानंदजी, स्वामी हरिचेतनानंदजी, स्वामी ललितानंद गिरीजी, महंत देवानंदसरस्वती, विनय रोहिला, प्रदीप बत्रा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय संस्कृतीतील संत परंपरा समाजाला जोडण्याचे, एकसंध ठेवण्याचे कार्य करते. तेच कार्य स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी भारत माता मंदिर स्थापनेतून सुरु केले. याशिवाय त्यांनी भारतीय सनातन संस्कृतीच्या जगभरात विखुरलेल्या प्रवाहांना एकत्रित आणण्याचे महत्वाचे कार्य केले. त्यांनी आपले सर्व आयुष्य मानवतेच्या कार्यासाठी वाहिले. जिथे कुठे आपत्ती, संकट आले, त्या ठिकाणी स्वामीजी धावून गेले. तिथे त्यांनी सगळे भेद बाजूला सारून मदतकार्य केले. यामाध्यमातून सनातन संस्कृतीची ओळख निर्माण केली. या प्रवासात त्यांनी कित्येकदा अनेक पदांचाही त्याग केला आणि आपल्या वैश्विक कार्याला पुढे नेण्यात धन्यता मानली. त्यामुळेच त्यांना जगभर अद्भूत व्यक्तित्व म्हणून सन्मान मिळाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आज जगभरातल्या अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत. पण भारतीय सनातन संस्कृती आजही टिकून राहीली आहे असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सनातन विचार भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य सांगणारे आणि सर्वात प्राचीन असे आहेत. आता सरस्वती संस्कृतीच्या उत्खननातूनही या विचारांच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे विज्ञान आणि इतिहास या दोन्ही कसोट्यांवर भारतीय जीवन पद्धती, सनातन संस्कृती समृद्ध असल्याचे सिद्ध झाले आहे. या भारतीय संस्कृतीने विविधता आत्मसात करून, तिच्या वैभवात भर घातली आहे. ही संस्कृती टिकवण्यात स्वामी सत्यमित्रानंदजी यांच्यासारख्या वाहकांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. स्वामीजीनी आपल्या आचरण, कार्यातून या संस्कृतीचे पोषण केले. ती भावी पिढ्यांकडे सुपूर्द केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सांस्कृतिक पुनरोत्थानाच्या कार्याला मोठी गती मिळाली आहे. त्यामुळे आता भावी पिढ्याही या सनातन संस्कृतीशी स्वतःला जोडून घेऊ लागली आहे. त्यांनाही या संस्कृतीचा अभिमान वाटू लागला आहे. यामागेही या संत, महंताच्या कार्याचा बहुमुल्य आधार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# शाहिद कपूरच्या 'ओ रोमियो' चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घाला; हुसेन उस्ताराच्या मुलीची न्यायालयात धाव

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी:** पुढील आठवड्यात प्रसिद्ध होणाऱ्या अभिनेता शाहिद कपूर अभिनित 'ओ रोमियो' चित्रपटाचे प्रदर्शन अडचणीत येण्याची शक्यता आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याच्या मागणीसाठी हुसेन उस्तारा नावाच्या कथित गुंडाच्या मुलीने सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. उस्ताराच्या आयुष्यावर हा चित्रपट आधारित असल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणी ६ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे.

दाऊद इब्राहिम याचा कट्टर वैरी अशी ओळख असलेला हुसेन उस्तारा याची मुलगी सनोबर शेख हिने चित्रपटाचे निर्माते साजिद नाडियादवाला आणि विशाल भारद्वाज यांच्याविरुद्ध दावा दाखल केला आहे. हा चित्रपट हुसैन झैदी यांच्या 'माफिया क्वीन्स ऑफ मुंबईक्ष८२१७; या पुस्तकावर आधारित असून झैदी यांनाही दाव्यात प्रतिवादी करण्यात आले आहे. तसेच, चित्रपटाचे पूर्व-प्रदर्शन करण्याची आणि न्यायालयात अहवाल सादर करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची किंवा इतर कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्याची मागणी शेख हिने न्यायालयाकडे केली आहे.

**वडिलांच्या व्यक्तिरेखेचे चुकीचे चित्रण**

आपले वडील मुंबईत पत्रकार म्हणून काम करत होते आणि त्यांनी पोलीस व गुप्तचर विभाग यांसारख्या विविध सरकारी संस्थांना संपूर्ण भारतभर, विशेषतः मुंबईत गुन्हे रोखण्यासाठी मदत केली होती. या कामांमुळे त्यांच्या जीवाला सतत धोका होता, याच कारणास्तव त्यांनी पोलीस आयुक्तांकडे बुलेट-प्रूफ जॅकेटसाठी अर्ज केला होता आणि त्यानंतर त्यांची विनंती मंजूर केल्याचे पत्र त्यांना ४ ऑगस्ट १९९४ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयाकडून पाठवण्यात आले. याशिवाय, आपल्या वडिलांनी दाऊदच्या डी-कंपनीला उघडपणे आव्हान दिले होते आणि त्या टोळीचे सदस्य त्यांना त्यांच्यासाठी एक धोकादायक व्यक्ती मानत होते, दाऊदच्या टोळीला आपल्या वडिलांमुळे धोका होता. त्यामुळेच, दाऊदच्या जवळच्या साथीदारांनी त्यांचा खून केला. त्यात कुख्यात गुंड छोटा शकील याचा समावेश होता. आपले वडील मुंबई पोलिसांसाठी खबऱ्या म्हणूनही काम करत होते आणि दाऊदच्या टोळीची गुप्त माहिती त्यांना पुरवत होते. तथापि, चित्रपटाच्या ट्रेलरवरून उस्तारा एक गुंड होता हे प्रतीत होत असून चुकीचे चित्रण असलेल्या चित्रपटाच्या प्रदर्शनामुळे आपल्या कुटुंबातील सदस्यांवर त्याचे गंभीर परिणाम होतील, असा दावा शेख हिने केला आहे.

मुंबई पोलिसांचे माजी चकमकफेम अधिकारी प्रदीप शर्मा यांच्या समाजमाध्यमावरील मुलाखतींचा संदर्भ देखील शेख हिने तिच्या दाव्यात दिला आहे. संबंधित चित्रपट काल्पनिक म्हणून चित्रित केला गेला असला तरी, त्याची मूळ कथा हुसेन उस्तारा यांच्या वास्तविक जीवनावर आधारित असल्याचे शर्मा यांनी मुलाखतीत म्हटल्याकडे शेख हिने लक्ष वेधले आहे. उस्तारा हा पोलिसांचा खबऱ्या होता, असेही शर्मा यांनी नमूद केल्याचा दावा तिने केला आहे.

## अजित दादांच्या विमान अपघाताची तातडीने चौकशी करावी रविकांत तुपकर



**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर, सतत सामान्य जनता असो वा राजकीय नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. अमोल मिटकरी आणि एकनाथ खडसे यांच्या कडून वारंवार घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे.

यावर क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर म्हणाले, 'ऐवढ्या मोठ्या नेते अजितदादा सारख्या व्यक्ती ज्या विमानातून प्रवास करतात, त्या विमानात बिघाड कसा होतो? पायलट बदलला जातो, असे शंका निर्माण करणारे प्रश्न अनेकांच्या मनात आहेत. या अपघातांची कसून चौकशी होऊन, दूध का दूध, पाणी का पाणी झाले पाहिजे. ज्यावर दोष असेल त्यांच्यावर तत्काळ कारवाई व्हावी.'

## सहयोग सोसायटीत शरदप्रतिभा पवार दाखल, सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पहिलीच भेट, विलीनीकरणाच्या चर्चांना उधाण

**बारामती/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बारामती येथील सहयोग सोसायटीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी गर्दी केलीय. आज शरद पवार यांनीही सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार हे आज दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीतील सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी दाखल झाले. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर शरद पवार यांची ही पहिलीच सांत्वनपर भेट असल्यानं या भेटीकडं राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार, भगिनी, तसेच आमदार रोहित पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंब उपस्थित होते. अजित पवार यांच्या निधनानंतर आणि सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर आज प्रथमच शरदप्रतिभा पवार सहयोग सोसायटीत दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे, शरद पवार हे अनेक वर्षांनंतर आज पुन्हा सहयोग सोसायटीत आले . या भेटीला भावनिक आणि राजकीय अशा दोन्ही दृष्टीनं मोठं महत्त्व आहे.

## पाण्यासाठी रायपूरच्या महिलांचा जिल्हा परिषदेत आक्रोश




**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या रायपूर गावात पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे. महाजल तसेच जलजीवन मिशनसारख्या योजनांअंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करूनही प्रत्यक्षात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार ग्रामस्थ महिलांनी केली आहे.

महिलांच्या म्हणण्यानुसार, तब्बल दोन महिन्यांनंतर पाणी मिळत असून त्यामुळे दैनंदिन जीवन जगणे कठीण झाले आहे. किमान आठ दिवसाआड तरी पाणीपुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी शेकडो महिला आज जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंतांच्या दालनात धडकल्या.

यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा अभियंत्यांसमोर महिलांनी आपली कैफियत मांडली. लवकरात लवकर प्रशासकीय स्तरावरील कामकाज पूर्ण करून रायपूर गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पुरस्काराकरिता
# २१ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणारे महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार आणि क्रांतीवीर राजे उमाजी नाईक या पुरस्कारांसाठी सन २०२५-२६ वर्षाकरिता इच्छुक व्यक्ती व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी व्यक्ती व संस्थांनी २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करावे असे आवाहन सहसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय यांनी केले आहे.

पुरस्कारासाठी अटी व शर्ती :- अर्जदार व्यक्ती, संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केलेले असावे. अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून शासन निर्णयात नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस पत्रे व प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. पुरस्काराबाबत अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. पुरस्कारासाठीचे अर्ज संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग येथे २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना, शासन निर्णयातील सविस्तर अटी व शर्ती तसेच अधिक माहिती सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, जिल्हा कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाने केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नदीजोड प्रकल्पांतील कामांचा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतला आढावा

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पांतील कामांना गती देण्याच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे- पाटील यांनी सविस्तर आढावा घेतला.

दमणगंगावैतरणागोदावरी नदीजोड प्रकल्प, दमणगंगाएकदरे गोदावरी नदीजोड प्रकल्प तसेच कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भीमा नदी खोऱ्यात वळविण्यासाठी सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा यावेळी घेण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे नदीजोड प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कोकणातील जलसमृद्ध खोऱ्यांमधील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून नाशिक व मराठवाडा भागातील पाणीटंचाई दूर करणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील अतिरिक्त जमिनी पर्यावरणपूरक व पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करून महामंडळाचे उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यात येणार आहेत. धरण क्षेत्रालगतच्या या जमिनी सार्वजनिक-खासगी भागीदारी () तत्त्वावर विकसित व व्यवस्थापित करण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. पुणे व सोलापूर जिल्ह्यांत कार्यवाही सुरू झाली असून या धोरणानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. नाबार्डच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या सिंचन प्रकल्पांसाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित असून त्यापैकी साडेआठ हजार कोटी रुपये जलसंपदा विभागास प्राप्त झाले आहेत. या निधीतून विविध सिंचन प्रकल्पांची कामे सुरू आहेत. सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी साडेसहा हजार कोटी रुपयांचे वितरण करण्याबाबत वित्त व नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे तसेच कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात पाणी आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून तातडीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

फ्लोटिंग सोलर पॉवर जनरेशन पॉलिसीचा आढावा

जलसंपदा विभागाने तयार केलेल्या फ्लोटिंग सोलर पॉवर जनरेशन पॉलिसीच्या आराखड्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. हा आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादर करण्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री विखे- पाटील यांनी दिले.

तसेच महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत पाटबंधारे नियम, १९७६ मध्ये प्रस्तावित बदल करण्याबाबतच्या तरतुदी मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात येणार असून, त्यासंदर्भातही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध सिंचन प्रकल्प, विकासकामे तसेच नदीजोड प्रकल्पांसाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींची माहिती सादर करण्यात आली.

## संक्षिप्त...

### बिऊरमध्ये बालकाचा जीव घेणारा बिबट्या अखेर जेरबंद



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :**सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील बिऊर येथे लहान बालकावर हल्ला करून त्याचा मृत्यू घडवून आणणारा बिबट्या अखेर वन विभागाच्या ताब्यात आला आहे. पुणे येथील रेस्क्यू टीमच्या मदतीने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत वन विभागाला रात्री बारा वाजण्याच्या सुमारास हा बिबट्या पकडण्यात यश आले.

घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याच्या शोधासाठी वन विभागाने डॉग स्क्वॉड, थर्मल कॅमेरे तसेच विविध ठिकाणी सापळे लावले होते. अखेर अथक प्रयत्नांनंतर बिबट्या जेरबंद करण्यात आला.पकडण्यात आलेल्या बिबट्याला सांगली येथील उपवनसंरक्षक कार्यालयात आणण्यात आले असून, पुढील उपचार व वैद्यकीय तपासणीसाठी त्याला पुणे येथे पाठवण्यात येणार आहे. दरम्यान, बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बालकाच्या कुटुंबाला वन विभागाकडून २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, वन विभागाच्या कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे

### रोहणा येथे सिकलसेल व कुष्ठरोग ‘स्पर्श’ अभियानांतर्गत जनजागृती

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या अरुणोदय सिकलसेल निमिया विशेष अभियान तसेच ‘कुसुम - कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (स्पर्श)’ अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, रोहणा येथे नागरिकांची तपासणी, समुपदेशन व व्यापक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. सुहासिनी शिरोडकर यांनी सिकलसेल तपासणीचे महत्त्व विशद केले. तसेच कुष्ठरोगाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून ‘स्पर्श’ अभियानाची उद्दिष्टे नागरिकांना समजावून सांगितली. वेळेवर तपासणी करून घेणे आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी धुताडमल यांनी मार्गदर्शन करताना ० ते ४० वर्षे वयोगटातील सर्व स्त्री-पुरुषांनी सिकलसेल तपासणी करून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. विशेषतः विवाहपूर्व सिकलसेल तपासणी करून घेणे महत्त्वाचे असून, त्यामुळे भविष्यातील आरोग्यविषयक धोके टाळता येऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये डॉ. एस. एल. शिराळकर (आयुर्वेदिक दवाखाना, वर्णा), वि. टी. माळे (LHV), वी. स. खाडे (AMM), एस. बी. भीमेवाल (AMM), परिमल उंदरे (MPW), जी. एस. लोड (परिचर), एस. डी. देशमुख (परिचर) यांचा सहभाग होता. तसेच ग्रामस्थांमधून अविनाश महाले (रोहणा), शामराव शास्त्री (वाघेरा), पांडुरंग शेळके आदी उपस्थित होते.

## पुन्हा एकदा सोन्या चांदीच्या दरात वाढ



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेच्या विमानवहाक नौकेच्या दिशेने येत असलेले एक इराणी ड्रोन पाडण्यात आले आहे. ही बातमी अमेरिकेच्या प्रसारमाध्यमांनी दिली आहे. यामुळे पुन्हा एकदा अमेरिका - इराण युद्धाची शक्यता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर बुधवार ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सोन्याचांदीच्या दरात पुन्हा एकदा वाढ दिसून आली. वाढत्या दरामुळे मध्यम वर्गीयांसाठी सोन्याची अथवा चांदीची खरेदी करणे दिवसेंदिवस कठीण होत असल्याचे चित्र आहे.

मुंबईत २४ कॅरेट शुद्ध १० ग्रॅम अर्थात एक तोळा सोन्याचा दर एक लाख साठ हजार ५३० रुपये एवढा झाला आहे. याआधी मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत २४ कॅरेट शुद्ध १० ग्रॅम अर्थात एक तोळा सोन्याचा दर एक लाख त्रेपन्न हजार ९३० रुपये होता. थोडक्यात सांगायचे तर २४ कॅरेट शुद्ध १० ग्रॅम अर्थात एक तोळा सोन्याच्या दरात अवघ्या २४ तासांत सहा हजार सहाशे रुपयांची वाढ झाली आहे.

मुंबईत २२ कॅरेट शुद्ध १० ग्रॅम अर्थात एक तोळा सोन्याचा दर एक लाख ४७ हजार १५० रुपये एवढा झाला आहे. याआधी मंगळवार ३ फ ेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत २२ कॅरेट शुद्ध १० ग्रॅम अर्थात एक तोळा सोन्याचा दर एक लाख ४१ हजार १०० रुपये होता. थोडक्यात सांगायचे तर २२ कॅरेट शुद्ध १० ग्रॅम अर्थात एक तोळा सोन्याच्या दरात अवघ्या २४ तासांत सहा हजार पन्नास रुपयांची वाढ झाली आहे.

याआधी मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत एक किलो चांदीचा दर दोन लाख ऐंशी हजार रुपये एवढा होता. थोडक्यात सांगायचे तर मुंबईत एक किलो चांदीचा दर अवघ्या २४ तासांत ४० हजार रुपयांनी वाढला आहे.

# सीआयएसएफ कडून रत्नागिरीत ‘वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६’चे आयोजन

## उपक्रमाचा आरंभ उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) आपल्या ५७ वर्षांच्या गौरवशाली सेवेचे औचित्य साधत १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी येथील पोलीस मैदानावर ‘वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन२०२६’ या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा आरंभ उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

किनारी व सागरी सुरक्षेबाबत जनजागृती

या सायक्लोथॉनचा उद्देश किनारी व सागरी सुरक्षेबाबत जनजागृती, राष्ट्रीय एकात्मता, तंदुरुस्ती, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे हा आहे. विशेष बाब म्हणजे या मोहिमेत ५० टक्के महिला सहभागी आहेत. या सायक्लोथॉनद्वारे किनारी भागातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेचे भान निर्माण करणे, नागरिक व ‘सीआयएसएफ’ यांच्यात समन्वय वाढवणे, तरुण पिढीला अमली पदार्थांच्या धोक्यांबाबत जागरूक करणे आणि बंदर सुरक्षेतील ‘सीआयएसएफ’च्या ५१ वर्षांच्या अनुभवाची माहिती देणे हा उद्देश आहे.

१९६९ मध्ये स्थापन झालेल्या ‘सीआयएसएफ’ने गेल्या ५७ वर्षांत रिफायनरीज, विमानतळ, बंदरे, मेट्रो रेल्वे, अणुऊर्जा प्रकल्प, अंतराळ केंद्रे यांसह देशाच्या अनेक सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या आस्थापनांची सुरक्षा सक्षमपणे सांभाळली आहे. सुरक्षेपुरतेच नव्हे तर जनजागृती, सामाजिक उपक्रम आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या कार्यक्रमांद्वारे सीआयएसएफ राष्ट्रीय सेवेची बांधिलकी जोपासत आहे.

६,६०० किलोमीटरचा प्रवास

‘वंदे मातरम्’ या देशभक्तीपर गीताच्या



१५० वर्षांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या कोस्टल सायक्लोथॉनमध्ये देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरून तब्बल ६,६०० किलोमीटरचा प्रवास करण्यात येणार असून, या उपक्रमाचा समारोप कोची येथे होणार आहे. मागील वर्षीच्या सायक्लोथॉन२०२५ ला ३० लाखांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता, तर २.९ कोटी डिजिटल संवाद नोंदविण्यात आले होते.

५२ किनारी गावे

‘तट प्रहरी’ म्हणून दत्तक

सामाजिक सहभागाच्या माध्यमातून ५२ किनारी गावांना ‘तट प्रहरी’ म्हणून दत्तक घेण्यात आले असून, त्या गावांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यप्रयोग, वैद्यकीय सेवा, खुली व्यायामशाळा, क्रीडा सुविधा तसेच तस्करी व बेकायदेशीर घुसखोरी रोखण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. रत्नागिरी येथील पोलीस मैदानावर १४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमात २०१९ मध्ये पुलवामामध्ये शहीद झालेल्या ४० सीआरपीएफ जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार असून रत्नागिरी जिल्ह्यातील चार शहीद जवानांच्या कुटुंबियांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्हा सांस्कृतिक पथक, एनसीसीचे विद्यार्थी तसेच सीआयएसएफ पथकाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.


## शब्दकोडे क्र. 77

आडवे शब्द

१. शुष्क, वाळलेला ४. मर्यादा, हद्द ६. दुधावरील घट्ट पापुद्रा ७. पंख ९. खळबळजनक १२. मुलीचा नवरा १३. डोंगराचा कोसळणारा भाग १५. आरोळी, गर्जना १६अ. तांदळाची मंद सुवासिक, लांब दाण्याची जात १७अ. अगदी खरे! १८. नामशेष २०. गवत, कडबा इ. २२. विठ्ठलपत्नी २३. उजेड २५. पुन्हा २६. वहीत मोकळी सोडलेली जागा २७. चलनवलन २८. रेचक २९. मोठा रस्ता ३०. आवाज, गोंगाट ३१. कापून ठेवलेले तुकडे ३३. विरोध, प्रतिकार करणारे ३४. पोलिसांच्या तावडीतून पळालेला ३६. वनराणी, जुन्या जमान्यातील एक नटीचे नाव ४१. झाकणाचे पात्र ४२. सोंगाड्या ४४. कमलनयन ४७. नरडे ४८. भोजनास योग्य असे ४९. मनातील अढी (ला.) ५०. वारा ५१. मैदान गाजवणारा खेळाडू ५३. अर्धी ओंजळ ५५. घात, वचक ५६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च ५८. मऊ ६०. नष्ट ६१. हे धरायला दिल्यास हात धरू नये! ६२. चषक ६३. बस्तान ६४. रणक्षेत्र ६६. सहायक ६८. तोफगाडी ६९. लोणी ७०. कांती, तेज

उभे शब्द

१. राग, क्रोध २. मच्छर ३. गंध ४. गावाचे प्रमुख ५. काढलेली सुट्टी ६. शिर्डीचे संत ७. माघारी येण्याचा रस्ता ८. विपत्तीची कहाणी १०. टक, दृष्टी ११. घोड्याच्या खुराला लावण्याची लोखंडी पट्टी १३. धमकी १४. चढता स्वर १६. शरीर १७. सभा १७अ. वाईट, सडलेले १८. भरभराट १९. रममाण २१. ढीग २३. प्रचार करणारा २४. समुद्रातील एक छोटा प्राणी, शिंपला २५. घागरा २६. संतोष, आनंद २७. नुकसान करणारे २९. पाठीतील हाडांच्या मालिकेतील एक-एक ३२. 'कमीत कमी' या अर्थाचा शब्दप्रयोग ३३. पायंडा, पद्धत ३५. आदर्श राजवट (ला.) ३७. डोळे ३८. कागदपत्रांचा गठ्ठा ३९. दुसरे ४०. मैत्री, वितुष्ट संपणे ४२अ. मोहक, मनाला भावेल असे ४३. बांगड्यांचा व्यवसाय करणारा ४५. पद्म, कमल ४६. बुक्का, पण लगावण्याचा ४८. गोल गोल फिरणारा ५०. फुरसत ५२. हिंदीत अपयशी ५४. भेग, फट ५५. श्रीरामाचे वडील ५७. पातक ५८. पारख करणारी दृष्टी ५९. श्रीविष्णू, नवरा ६०. नाव ६२. वाळवी, उणीव ६४. एकटा ६५. बारावी रास ६६. अभिप्राय ६७. बारा वर्षांचा काळ



### शब्दकोडे क्र. 76 चे उत्तर

आडवे उत्तर

१.करवंटी ३.मर्दन ५.कदम ९.कज्जा १०.दमादमाने १२.नयनबाण १५.संतापजनक १८.मात्रा १९.काम २०.हातोहात २१.डबा २३.सोनखत २४.मानव २६.रकाना २८.नापाक ३०.कान ३१.रसदार ३३.नसता ३५.कावकाव ३६.नवार ३७.नाट ३८.कलमा ३९.ताडन ४१.संवाद ४६.रया ४९.विद्या विनयेन शोभते ५३.त्रेधा ५५.कोर ५६.हिकमत ५८.सरसरीत ६०.माऊ ६१.सारी ६२.डफ ६३.सावधान ६५.चेक ६७.तरुणाई ६८.वारस ७०.अवसानघातकी ७३.बायको ७५.कर्ज ७६.रक्षा ७७.कडबा ७८.पसरट

उभे उत्तर

१.कर्दनकाळ २.वंदन ३.मज्जा ४.नरसंहार ५.कलप ६.मद ७.मद ८.सुनेत्रा ९.कण १०अ.माकड ११.मामा १३.यम १४.बावनकस १६.तात १७.जवान २०.हात २२.बारदान २३.सोपान २४.मानवता २५.वरदान २७.कारवाई २९.मुकामार ३०.काका ३२.जनावर ३४.ताकद ४०.डझन ४२.वार्ता ४३.विद्या ४४.मन ४५.आतेभाऊ ४७.यात्रेकरी ४८.सरस ४९.विश्वासघातकी ५०.विनित ५१.येणे ५२.शोक ५४.धम ५६.हिसाब ५७.तडकसार ५९.बांधा ६३.साईबाबा ६४.नवा ६५.चेव ६६.मघा ६९.सपाट ७०.अर्ज ७१.नक्षा ७२.तळी ७४.कोप

# 'नायक' स्टाईलमध्ये मैदानात उतरले नगराध्यक्ष किशोर गारोळे

## निकृष्ट कामांना थेट ब्रेक, रखडलेल्या विकासकामांची वन-टू-वन पाहणी

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर शहरात नागरी समस्या अनेक असल्या तरी नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी आपल्या कार्याची सुरुवात थेट सामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांपासून केली आहे. शहरातील खालचा स्टॅन्ड, भाजी मार्केट यांसारख्या गर्दीच्या ठिकाणी दररोज महिला व पुरुषांची मोठी वर्दळ असते. मात्र आजवर या ठिकाणी स्वच्छतागृहांची सोय नव्हती. ही बाब लक्षात घेऊन नगराध्यक्षांनी तातडीने निर्णय घेतला आहे.

शहरात एकूण २१ स्वच्छतागृहे उभारण्यात येणार असून त्यामध्ये १७ मुत्रीघर तसेच ४ टॉयलेट व बाथरूमचा समावेश आहे. सर्व ठिकाणांची लोकेशन्स अंतिम करण्यात आली असून पुढील १० ते १५ दिवसांत कामाला सुरुवात होणार आहे. येत्या मार्च महिन्याच्या आत ही सर्व कामे पूर्ण केली जातील, अशी ग्वाही नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी दिली. अतिक्रमण, लोकेशनचा गोंधळ व फाईलवर्कमधील अडथळे दूर करण्यासाठी नगराध्यक्ष स्वतः नगरपरिषदेच्या अभियंत्यांसह प्रत्यक्ष मैदानात उतरले असून कामांना गती देण्यात आली आहे.

फोनवर प्रश्न सुटला नाही, तर थेट नागरिकांच्या घरी जाऊन समस्या सोडवू, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे नगराध्यक्ष थेट वॉर्डात जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घेत आहेत.

कामात दिरंगाई करणाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा देण्यात आला असून, ''उद्या नाही, आजच काम'' असा आदेश देण्यात आला आहे. शहरातील रखडलेल्या विकासकामांची वन-टू-वन पाहणी, कामाच्या दर्जावर काटेकोर लक्ष ठेवणे आणि निकृष्ट काम थेट थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्याचा कॉन्ट्रॅक्टर काम करण्यास असमर्थ असल्यास त्याला बदलून सक्षम कॉन्ट्रॅक्टरमार्फत काम पूर्ण केले जाईल, असेही नगराध्यक्षांनी स्पष्ट केले.

यापूर्वी विकासाच्या नावाखाली मोठा खर्च झाला असला तरी त्याचा परिणाम प्रत्यक्ष जमिनीवर दिसून आला नाही. मोठ्या प्रकल्पांनाच प्राधान्य दिले गेले आणि सामान्य नागरिकांच्या छोट्या-मोठ्या अडचणी दुर्लक्षित राहिल्या. याबाबत बोलताना नगराध्यक्ष किशोर गारोळे म्हणाले, ''पैसे कमावणे हा माझा हेतू नाही. समाजकारण हाच माझा अजेंडा आहे.''

सिनेमासारखी थेट ॲक्शन, ठोस निर्णय आणि जनतेशी थेट संवाद यामुळे मेहकर शहरात एक नवा प्रशासनिक बदल अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आता एकच चर्चा आहे हा फक्त नगराध्यक्ष नाही, हा नायक आहे. यावेळी गटनेते विलास चनखोरे, नगरसेवक महेश रिंढे, नगरसेवक प्रा. सतीश ताजणे, नगरसेवक नितीन तुपे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, आकाश घोडे, निसार अन्सारी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## पुणेकरांनो, आता एटीएममधून पैसे काढतानाही जरा जपून, तरुणासोबत रात्रीच्या अंधारात घडली भयंकर घटना

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या शिवाजीनगर परिसरात लुटमारीची एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एटीएममधून पैसे काढून बाहेर पडणाऱ्या एका ३२ वर्षीय तरुणाला बेदम मारहाण करून दोन चोरट्यांनी त्याच्याकडील २८ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. या घटनेमुळे परिसरात रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तक्रारदार तरुण हा कसबा पेठ परिसरात राहतो. १ जानेवारी रोजी रात्री पावणेदहाच्या सुमारास तो आपल्या एका मित्रासह शिवाजीनगरमधील श्री म्हसोबा मंदिराजवळील एका एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेला होता. एटीएममधून पैसे काढून जसा तो बाहेर पडला, त्याच वेळी दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांना अडवले.

## मेहकर शोकसागरात स्वर्गीय अजितदादा यांच्या अस्थिकलश दर्शनाला जनसागर



**मेहकर/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर मेहकर येथे अस्थिकलश दर्शनाचा कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला. अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दु:खद निधन झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनामुळे राज्याने एक प्रभावी



नेतृत्व गमावल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. आज मेहकर नगर परिषद मैदानात अस्थिकलश दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येकाने अश्रूंनी डोळे भरून अस्थिकलशाचे दर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, सिंदखेडराजा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे, मेहकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे, राष्ट्रवादीचे गिरधर पाटील ठाकरे.माजी आ.संजय रायमुलकर आकाश घोडे. माजी.आ. राहुल बोंद्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी दिवंगत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देत भावना व्यक्त केल्या. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही मोठ्या भावनेने सहभाग घेत आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली. संपूर्ण परिसरात शोकाकुल वातावरण पाहायला मिळाले.

## बुलढाणा जिल्ह्यात 'अरुणोदय' सिकलसेल अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### व्यापक जनजागृतीमुळे १ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी पूर्ण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** सिकलसेल मुक्त महाराष्ट्र या राज्य शासनाच्या उद्दिष्टाच्या दिशेने बुलढाणा जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ''अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान'' ला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. सिकलसेल आजाराचे निर्मूलन व जनुकीय दोष पुढील पिढीत जाऊ नयेत, यासाठी जिल्हा आरोग्य विभागामार्फत प्रभावीपणे ही मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती उपक्रम राबविण्यात आले असून, या मोहिमेमुळे आतापर्यंत १ लाखांपेक्षा अधिक नागरिकांची सिकलसेल तपासणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे.

या अभियानाची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये गावोगावी सभा व माहिती सत्रे, शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृतीपर व्याख्याने व प्रभातफेरी, घरोघरी जाऊन आशा स्वयंसेविका व आरोग्य सेवकांमार्फत समुपदेशन, तसेच सोशल मीडिया, पोस्टर्स, बॅनर्स व माहितीपत्रकांच्या माध्यमातून व्यापक प्रसिद्धी करण्यात आली. आकाशवाणीवरील मुलाखती व सोशल मीडियावरील प्रचारामुळे नागरिकांमधील भीती दूर होऊन तपासणीसाठी लोकांचा कल वाढला आहे.

या विशेष अभियानांतर्गत जिल्ह्यातील ० ते ४० वर्षे वयोगटातील एकूण २ लाख २० हजार ५०० नागरिकांची तपासणी करण्याचे लक्ष्य आरोग्य विभागाने निश्चित केले आहे. त्यापैकी आतापर्यंत १ लाख नागरिकांची सिकलसेल तपासणी पूर्ण झाली असून, तपासणीदरम्यान १४५ नवीन सिकलसेल कॅरिअर (वाहक) रुग्ण आढळून आले आहेत. सिकलसेल आजार हा अनुवांशिक असल्याने तो पुढील पिढीत संक्रमित होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने विशेष उपाययोजना केल्या आहेत. शोधण्यात आलेल्या १४५ नवीन रुग्णांसाठी ४ ते ७ फेब्रुवारी या कालावधीत विशेष विवाहपूर्व समुपदेशन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रांमधून रुग्णांना भविष्यातील धोके, प्रतिबंधात्मक उपाय व आवश्यक काळजीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सिकलसेल मुक्त जिल्हा घडविण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी आपली तपासणी करून घ्यावी. उर्वरित नागरिकांनीही या मोहिमेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी केले आहे.

## जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा शुभारंभ

# अत्याधुनिक क्रीडा सुविधांमुळे बुलढाण्याचा नावलौकिक वाढणार : आ. संजय गायकवाड

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** दैनंदिन जीवनातील वाढता ताण-तणाव व मोबाईल-समाजमाध्यमांच्या अतिक्रमणामुळे खेळ व सांस्कृतिक परंपरा मागे पडत आहेत. अशा परिस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उपयुक्त ठरतील, असे प्रतिपादन आमदार संजय गायकवाड यांनी केले. बुलढाणा शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक, इंडोर स्टेडियम व जलतरण तलाव उभारून क्रीडा क्षेत्रात नवी ओळख निर्माण केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

बुलढाणा जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा शुभारंभ आज जिल्हा क्रीडा संकुल येथे आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात होते. यावेळी व्यासपीठावर अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, राज्य उत्पादन शुल्क उपायुक्त नवलकर, अधीक्षक हांडे, प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, सतीश देशमुख, सौ. रिपिका खरात, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ, जिल्हा जलसंधारण अधिकारी स्नेहल माने, कृषी विकास अधिकारी पुरुषोत्तम अनगाईत, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी मंडोगडे यांच्यासह विविध खातेप्रमुख उपस्थित होते.

आमदार गायकवाड पुढे म्हणाले की, प्रशासकीय कामकाजातील ताण कमी करण्यासाठी खेळ व छंद जोपासणे आवश्यक आहे. सुदृढ शरीर आणि सशक्त मनासाठी अशा स्पर्धा प्रेरणादायी ठरतात. पंचांनी निष्पक्ष व वस्तुनिष्ठ निर्णय द्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी शिस्त, सभ्य व क्रीडास्पृह वृत्तीने स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन केले व क्रीडा विकासासाठी आमदार गायकवाड यांच्या योगदानाबद्दल आभार मानले. प्रास्ताविकात




आयोजन समितीचे सचिव आशिष पवार यांनी ४ ते ६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या स्पर्धांची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र गीत गायन, दीप प्रज्वलन, क्रीडा ध्वजारोहण, क्रीडा ज्योत प्रज्वलन व खेळाडूंची शपथ घेण्यात आली. रंगीबेरंगी फुगे सोडून स्पर्धांचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी तर आभार प्रदर्शन प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी केले.

## वृत्तविशेष...

## बुलढाण्यात राज्यस्तरीय शालेय शूटिंगबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल येथे १७ वर्षांखालील मुले व मुलींच्या राज्यस्तरीय शालेय शूटिंगबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २ आणि ३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध विभागांतून खेळाडू, प्रशिक्षक आणि पंच अशा एकूण २११ जणांचा सहभाग होता. स्पर्धेचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कारार्थी टी. एस. सोर, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील आणि जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना सदाशिव शेलार यांनी खेळाडूंना क्रीडा क्षेत्रातील ५ टक्के आरक्षणाच्या संधीचा लाभ घेऊन करिअर घडविण्याचे आवाहन केले. टी.एस. सोर यांनी खेळाडूंचे मैदानाशी असलेले नाते अधोरेखित करत शूटिंगबॉल खेळाच्या विकासासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू गौरी म्हस्के हिने खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. तसेच गौरी म्हस्के, कार्तिकी गरगडे आणि डॉ. निकीता वाकोडे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. रात्रीच्या वेळी प्रकाशझोतात झालेले सामने या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विविध तालुक्यांच्या क्रीडा अधिकाऱ्यांनी या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## खामगाव नगर परिषदेच्या अवैध करवाढीविरोधात वकील संघाचा एल्गार



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव नगर परिषदेने मालमत्ता करात १०० ते १०००% वाढ आणि पाणीपट्टीत ५०% वाढ केली आहे. वकील संघ आणि सजग नागरिकांनी हे पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा दावा करत प्रशासनावर तोफ डागली आहे.

ही करवाढ मागे न घेतल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा कायदेशीर नोटिशीद्वारे देण्यात आला आहे. मालमत्ता कराचे मूल्यांकन केवळ सरकारी अधिकाऱ्यांनी करणे बंधनकारक असताना, हे काम 'स्थापत्य कन्सल्टंट' या खाजगी एजन्सीला देणे नियमबाह्य आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारलेला असताना, कोणताही ठराव न घेता प्रशासनाने परस्पर करवाढीची नोटीस काढली आहे. 'संदीप गांधी विरुद्ध महाराष्ट्र शासन' या खटल्यातील उच्च न्यायालयाच्या निकालानुसार खाजगी संस्थेने केलेली कर आकारणी अवैध ठरते. अव्वाच्या सव्वा करवाढीच्या या नोटिशीमुळे शहरात खळबळ उडाली असून, प्रशासकीय राजवटीतील या निर्णयाला आता न्यायालयात आव्हान दिले जाणार आहे.

## प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन

### राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ''प्रवासी राजा दिन'' व दुपारी ३ ते ५ या वेळेत ''कामगार पालक दिन'' आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील.

बुलढाणा विभागातील बुलढाणा आगार येथे दि. ११ फेब्रुवारी रोजी तर चिखली आगार येथे दि. १८ फेब्रुवारी खामगाव आगार येथे दि. २५ फेब्रुवारी, मेहकर आगार येथे दि. ४ मार्च, मलकापुर येथे दि. ११ मार्च, जळगाव जामोद येथे दि. १८ मार्च व शेगांव आगार येथे दि. २५ मार्च रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.